CMYK

बीड । बुधवार

०७.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ३६

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घ्या

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यांत घ्या, असा महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने (SC) दिला आहे. त्यामुळे राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यासह रखडलेल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी म्हटले की, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची (Local Bodies Election) अधिसूचना पुढील चार आठवड्यात निघाली पाहिजे. यानंतर चार महिन्यांत निवडणुकीची प्रक्रिया संपन्न झाली पाहिजे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिले आहेत.

महाराष्ट्रात पंचायत निवडणुकीतील ओबीसी आरक्षण प्रकरणावर सुनावणी करताना न्या. सूर्यकांत म्हणाले की, देशात आरक्षण हे रेल्वेच्या डब्यासारखे झाले आहे. जे लोक त्यात चढले आहेत, ते दुसऱ्यांना आत येऊ द्यायला तयार नाहीत. याचिकाकर्त्यांतर्फे इंदिरा जयसिंह यांनी सुप्रीम कोर्टाकडे महाराष्ट्रात पंचायत निवडणुका घेण्याची मागणी केली. इंदिरा जयसिंह म्हणाल्या की, निवडून आलेल्या स्थानिक संस्था अस्तित्वात नाहीत, त्यांच्या जागी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. न्या. सूर्यकांत म्हणाले की, फक्त काही विशिष्ट वर्गांनाच आरक्षण का मिळावे? सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेल्या इतर लोकांना आरक्षण का मिळू नये? यावर विचार करणे ही राज्यांची जबाबदारी आहे, असे न्यायमूर्तींनी म्हटले.

या निवडणुका अडवून ठेवण्याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, ओबीसी आरक्षणाबाबत २०२२ च्या आधीची परिस्थिती होती, ती परिस्थिती कायम ठेवावी. याचिकाकर्त्यांनी म्हटले होते की, २०२२ मध्ये अहवाल आला त्यामध्ये ओबीसींच्या जागा कमी करण्यात आल्या. त्यामुळे न्यायालयाने २०२२ पूर्वीची परिस्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले. राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला सप्टेंबर

▶▶ उर्वरित पान २ वर

# प्राप्त तक्रारींवरुन बोगस डॉक्टर्सची यादी तयार करा : जिल्हाधिकारी

## नागरिकांनी माहिती देण्याचेही आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हयात बोगस डॉक्टर संदर्भाने आलेल्या तक्रारीनुसार संशयित डॉक्टर्सची यादी तयार करुन त्यावर वेळोवेळी तपासणी करुन याबाबत कारवाई करावी असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.



जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीची त्रैमासिक सभा आज झाली यात त्यांनी आतापर्यंतच्या कार्यवाहीचा आढावा घेतला. गेल्या ९ म हिन्यात तालुकास्तरीय तपासणी पथकाने ३ ठिकाणी तपासणी केली मात्र असे डॉक्टर त्या ठिकाणी आढळून आले नाहीत असे सांगण्यात आले. नागरिकांना आवाहन- आपल्या गावात कोणी बोगसपणे वैद्यकीय व्यवसाय करीत असेल तर नागरिकांनी आपापल्या भागातील तालुका आरोग्य अधिका-याकडे तक्रार द्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी नागरिकांना केले आहे.

तालुक्यासह गावपातळीवर ए.एन.एम. तसेच आशा वर्कर यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यात 16 ठिकाणी 'मॉक सिक्युरिटी ड्रिल'



**मुंबई । प्रतिनिधी**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानदरम्यान वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना बुधवारी दिनांक ७ मे रोजी विविध आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्याच्या उद्देशाने मॉक सिक्युरिटी ड्रिल राबवण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार

**• महाराष्ट्रात १६ ठिकाणी मॉकड्रिल**

**मुंबई, उरण-जेएनपीटी, तारापूर, पुणे, ठाणे, नाशिक, थळ-वायशेत, रोहा-धाटाव-नागोठाणे, मनमाड, सिन्नर, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग**

राज्यातील १६ ठिकाणी सिक्युरिटी ड्रिल घेण्यात येणार आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत देशभरातील २४४ जिल्हा नागरी संरक्षण केंद्रांची स्थिती तपासण्यात आली. यामध्ये निवारा केंद्रे, इशारा देणारी यंत्रणा आणि समन्वय सुविधा कार्यरत आहेत की दुरुस्तीची गरज आहे, याचे मूल्यमापन करण्यात आले. या ड्रिलचा महत्त्वाचा भाग म्हणजे सामान्य नागरिकांना प्रशिक्षण देणे असणार आहे. गृह मंत्रालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, या मॉक ड्रिलमध्ये हवाई हल्ल्याचा इशारा देणाऱ्या सायरन आणि ब्लॅकआऊट (वीज बंदी) परिस्थितीला कसा प्रतिसाद द्यावा, यावर विशेष भर दिला जाणार आहे. नागरिकांना त्यांच्या घरी


▶▶ उर्वरित पान २ वर

# साहेब गेवराईतील नामांकित हॉटेल मध्ये आतंकवादी घुसलेत

## युवकाने '११२'डायल करून माहीती दिल्याने पोलीसाची धांदल

**गेवराई । प्रतिनिधी**

साहेब, गेवराईतील एका नामांकित हॉटेलमध्ये आतंकवादी घुसलेत त्यांना पकडून ठेवले आहे. अशी माहीती एकाने '११२'वर वारंवार केल्याने पोलीसांची चांगलीच धांदल उडाली. मात्र, ही खोटी अफवा दिलेल्या युवकाच्या तलवाडा पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत.



मन्यारवाडी(ता. गेवराई जि.बीड) गणेश सखाराम डिंगरे याने परवा रविवारी(ता ४)रोजी नागपूर येथील कंट्रोल विभागास वारंवार '११२'डायल करून गेवराई येथील नामांकित हॉटेल सम्राट येथे आतंकवादी घुसले आहेत.

त्यांना येथे पकडून ठेवले असून, अशी खोटी माहीती दारुच्या नशेत तर्रर होऊन पोलीस प्रशासनाची दिशाभूल केली.या प्रकरणी तलवाडा पोलीसांनी दक्ष राहून वारंवार फोन करणा-याचे लोकेशन तपासत खोटी माहीती देणारा गणेश डिंगरे यास घनसावंगीच्या बाणेगावात ताब्यात घेतले.

सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके,फौजदार सुनिल बोडखे,पोलीस जमादार विठ्ठल चव्हाण यांनी ही कारवाई केली असून, खोटी माहीती देणा-या गणेश बोडखे याच्याविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून वैभवी देशमुख हिच्या बारावी परीक्षेतील यशाबद्दल अभिनंदन

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हीने अत्यंत कठीण, आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जात इयत्ता बारावी परीक्षेत विज्ञान शाखेतून ८५.३३ टक्के गुण मिळविल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तिचे अभिनंदन केले आहे. वैभवीने



मिळविलेल्या यशाने तिच्या अंगभूत गुण, हुशारी, धैर्य, संयम, जबाबदारीच्या जाणीवेचं दर्शन



घडल्याचे सांगून तिच्या यशाने महाराष्ट्राला आनंद झाला आहे, अशा शब्दात त्यांनी तिचे कौतुक केले आहे. वैभवी देशमुख हिला पाठविलेल्या अभिनंदनपर पत्रात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे की, इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या परीक्षेत विज्ञान शाखेत ८५.३३ टक्के गूण मिळवून तू उत्तीर्ण झाल्याचे समजून मझ्यासह संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला ▶▶ उर्वरित पान २ वर

# टाळ-मृदंगाच्या गजर, भव्य शोभा यात्रा, नेकनूरमध्ये संत वंकट स्वामी महाराज पुण्यतिथी उत्सवाची भव्य सुरुवात!



**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या....८१ पुण्यतिथी उत्सवाची मोठा थाटात आज सुरुवात झाली.भव्य शोभा यात्रेत हजारो कलशधारी महिला, शेकडो बाल वारकरी टाळ मृदंगाच्या जयघोषात...संत महंतांच्या हस्ते टाळ, विना, मृदंग, पालखी पूजनाने सुरुवात झाली. यावेळी हजारो वारकरी सहभागी झाले होते. आठ दिवस अध्यात्मिक ज्ञानदान व अन्नदानाची मेजवानी राहणार आहे.



# अण्णाभाऊ साठेंच्या कन्या शांताबाई साठे यांचे निधन

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकशाहीर आणि कामगारांच्या संघर्षाचे ज्वलंत प्रतीक असलेल्या कॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या कन्या कॉ. शांताबाई साठे (दोडके) यांचं रविवारी निधन झालं. वयाच्या ९०व्या वर्षी त्यांनी मुंबईतील कांदिवली येथील खासगी रुग्णालयात शेवटचा श्वास घेतला. त्या अविवाहित होत्या. त्यांच्या पश्चात लहान बहीण शकुंतला, भाचे-भाच्या आणि नातवंडांचा परिवार आहे. त्यांच्या निधनाने एक सांस्कृतिक आणि वैचारिक पर्व संपुष्टात आलं आहे.

संघर्षमय आयुष्याचा शांत लढा- शांताबाई साठे या अण्णाभाऊ साठे यांच्या द्वितीय पत्नी कॉ. जयवंताबाई दोडके यांची कन्या होत्या. बालवयातच कम्युनिस्ट पक्षाच्या 'बाल संघात' सहभागी होत त्यांनी सामाजिक संघर्षात पहिले पाऊल टाकले. कॉ. डांगे, कॉ. आर. बी. मोरे यांच्या मुलांबरोबर त्यांनी अनेक सांस्कृतिक उपक्रमात सहभाग घेतला. लाल बावटा कला पथकात त्यांनी शाहीर अमर शेख आणि शाहीर दत्ता गव्हाणकरांसोबत काम केलं. या कार्याच्या दरम्यान त्यांचं योगदान केवळ सहकलाकार म्हणून नव्हे, तर कार्यकर्ती आणि संघटक म्हणूनही लक्षणीय ठरलं.

तुरुंगवास आणि आर्थिक संघर्ष- ▶▶ उर्वरित पान २ वर

# तब्बल ३५ वर्ष नगरपालिकेची सत्ता भोगणाऱ्या क्षीरसागर नी शहरवासीयांना पाईपलाईन मध्ये मरून पडलेल्या सडलेल्या कुत्र्याचे पाणी पाजून कुठला पुरुषार्थ साध्य केला: नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदेमध्ये गेल्या तब्बल ३५ वर्षापासून क्षीरसागरांची सत्ता आहे क्षीरसागर नुसते फुसके वचने देऊन लोकांना भूलथापांना बळी पडतात हे जनतेला आता कळून चुकले आहे बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात असे बोलणारे शिरसागर यांना आता जनतेने त्यांची जागा





दाखवण्याची वेळ आलेली आहे बीडमध्ये कुठल्याही निवडणूक जवळ आली की मग नगरपालिकेची निवडणुक असो किंवा विधान परिषदेची किंवा लोकसभेची निवडणुक असो अशा निवडणुका जवळ आल्या की आम्ही हे करू आम्ही ते करू नुसते खोटे आणि भूलथापाचे आश्वासन देणारे हे क्षीरसागर मात्र आता फेल ठरले आहेत त्यांनी गेले ३५ वर्ष बीड नगर परिषदेची सत्ता स्वतःची खळगी भरण्यासाठी व काही बगलबच्चाची खळगी भरण्यासाठी भोगली आहे परंतु त्यांना पाईपलाईन व्यवस्थित बीड शहराला पाणीपुरवठा करणारी करता आली नाही आत्ताच एका वर्तमानपत्र मध्ये एक बातमी प्रकाशित झाली की बीडला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन मध्ये एक ते दोन असे मेलेले सडलेले अवस्थेत असलेले कुत्रे दिसून आले तेच पाणी बीड करांनी पिले आहे आता याचे परिणाम येणाऱ्या भविष्य काळामध्ये नागरिकांच्या आरोग्यावर काय होणार आणि याला जबाबदार कोण असणार हा देखील प्रश्न आता बीड शहरातील नागरिकांना पडला आहे अनेक वेळेस

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# महाराष्ट्रात सरकारी नोकरीची सुवर्णसंधी! पगार दीड लाख रुपयांच्या पुढे, कसा कुठे कराल अर्ज?

जर तुम्ही वैद्यकीय किंवा पशुपालन क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न पाहत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी खूप उपयुक्त आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (चझड्ड) पशुधन विकास अधिकारी (LDO) आणि सहाय्यक प्राध्यापक पदांसाठी भरतीची अधिसूचना जारी केली आहे. भरतीसाठी अर्ज करण्यासाठी, इच्छुक आणि पात्र उमेदवार आयोगाच्या अधिकृत वेबसाइट ग्पिि.र्सेी.ळप ला भेट देऊन ऑनलाइन अर्ज करू शकतात.

पशुधन विकास अधिकाऱ्यांसह सहाय्यक प्राध्यापकांची भरती होणार या भरती मोहिमेद्वारे राज्यात पशुधन विकास अधिकाऱ्यांची (एलडीओ) २७९ आणि सहाय्यक प्राध्यापकांची ७१६ पदे भरली जाणार आहेत. तर एलडीओ पदासाठी, उमेदवाराकडे पशुवैद्यकीय विज्ञान किंवा पशुवैद्यकीय विज्ञान आणि पशुसंवर्धन या विषयात बॅचलर पदवी असणे आवश्यक आहे. सहाय्यक प्राध्यापक पदासाठी, मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयातून एमडी, एमएस, डीएनबी किंवा पीएचडी पदवी आवश्यक आहे, तसेच एक वर्षाचा वरिष्ठ निवासी अनुभव आवश्यक आहे. किती मिळणार पगार? वयोमर्यादेबद्दल बोलायचे झाले तर, उमेदवारांचे वय १८ ते ४० वर्षांच्या दरम्यान असावे. तर राखीव प्रवर्गाला नियमांनुसार सवलत दिली जाईल. उमेदवारांची निवड स्क्रीनिंग टेस्ट आणि मुलाखतीच्या आधारे केली जाईल. परीक्षेच्या तारखा आणि प्रवेशपत्रांची माहिती आयोगाकडून स्वतंत्रपणे जारी केली जाईल. पगाराबद्दल बोलायचे झाले तर, एलडीओला दरमहा ५६१०० ते १७७५०० रुपये दिले जातील. तर सहाय्यक प्राध्यापकांना दरमहा ५७७०० ते १८२२०० रुपये वेतन मिळेल. सर्वप्रथम उमेदवारांनी mpsc.gov.in या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी. यानंतर 'ऑनलाइन अर्ज' विभागात जा. त्यानंतर उमेदवारांनी संबंधित पदाच्या लिंकवर क्लिक करावे आणि नोंदणी करावी. आता उमेदवार अर्ज भरतात, कागदपत्रे अपलोड करतात आणि फी भरून फॉर्म सबमिट करतात. दरम्यान जे विद्यार्थी या पदांसाठी पात्र आहेत, त्यांनी लवकरात लवकर अर्ज करावेत. कारण महाराष्ट्रात सरकारी नोकरीची ही मोठी संधी आहे. पशुधन विकास अधिकाऱ्यांची (एलडीओ) २७९ आणि सहाय्यक प्राध्यापकांची ७१६ पदे भरली जाणार आहेत. मोठ्या प्रमाणात जागा देखील निघाल्या आहेत. त्यामुळं पात्र उमेदवारांनी अर्ज करावेत. दरम्यान, उमेदवारांनी mpsc.gov.in या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी. या बेवसाईटवर तुम्हाला आवश्यक ती सर्व माहिती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे या पदांसाठी पगार देखील चांगला मिळणार आहे. एलडीओला दरमहा ५६१०० ते १७७५०० रुपये दिले जातील. तर सहाय्यक प्राध्यापकांना दरमहा ५७७०० ते १८२२०० रुपये वेतन मिळेल.

पान १ वरून पुढे...

## स्थानिक स्वराज्य...

महिन्यापर्यंत राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे जवळपास पाच वर्षांपासून रखडलेल्या मुंबई-पुण्यासह विविध महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर पंचायत निवडणुका घेण्यास हिरवा कंदील मिळाला आहे. OBC Reservatio in Local Bodies: नेमकं प्रकरण काय? महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना २७ टक्के इतकं आरक्षण देण्यात आले आहे. मात्र, २०२१ साली महाराष्ट्र निवडणूक आयोगानं वाशिम, अकोला, नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांमधील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये ओबीसी आणि एससी/एसटींना ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण देणारं नोटिफिकेशन जारी केलं होतं. याविरोधात नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावेळी सुप्रीम कोर्टाने हे आरक्षण रद्द करत इथल्या ओबीसी उमेदवारांसाठीची निवडणूकही सर्वोच्च न्यायालयानं रद्द केली होती. यानंतर २७ टक्के आरक्षणानुसारच जिल्हा परिषदेच्या निवडणुका घ्या, असे आदेशही न्यायालयाने दिले होते. या निर्णयाला ठाकरे सरकारनं आव्हान दिलं होतं. मात्र आता ठाकरे सरकारची ही याचिका फेटाळून लावली होती. सर्वोच्च न्यायालयाने २०२१ साली यासंदर्भात निकाल दिला होता.

BMC Election: सर्वोच्च न्यायालय महानगरपालिका निवडणुकीबाबत काय म्हणालं? १)स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीबाबत चार आठवड्या नोटिफिकेशन काढा आणि चार महिन्यांच्या आत निवडणूक घ्या. २)१९९४ ते २०२२ पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती, त्यानुसारच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घ्या. ३) राज्य सरकारला आणि राज्य निवडणूक आयोगने दिलेल्या कार्यकाळात कार्यवाही करावी. ४)ओबीसींच्या जागा कमी होत्या हा याचिकाकर्त्यांचा दावा होता, त्यावर कोर्टाने २०२२ पूर्वीची स्थिती कायम राहील असे निर्देश दिले. ५) आयोगाचा तो रिपोर्ट आहे त्याच्यात याचिकाकर्त्यांचं म्हणणं होतं की, २०२२ मध्ये जो रिपोर्ट आलाय त्याच्यात ओबीसी सीट हे कमी केले आहेत, त्यामुळे आधीच्या परिस्थितीनुसार २०२२ ची आधीची परिस्थिती होती १९९४ ते २०२२, त्या परिस्थितीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातील. Supreme Court: कोर्टात काय झालं? आज आम्ही एक मुद्दा सगळ्यात महत्त्वाचा अधोरेखित केला तो असा आहे की महाराष्ट्रामध्ये आज पाच वर्षांपेक्षा अनेक प्रकरणांमध्ये प्रशासक जे आहेत जे राज्यघटनेची आपली जी मूळ तरतूद आहे की लोकप्रतिनिधींनी सर्व लोकल बॉडी चालवाव्यात, त्याच्याही विपरीत आहे. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा नमूद केलं की, तुमच्या कार्पोरेशनमध्ये औरंगाबाद, नवी मुंबई येथे पाच वर्षांपेक्षा जास्त कार्यकाळ हा प्रशासकांचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने असेही सांगितलं की बऱ्याचशा तक्रारी आमच्यासमोर आल्या आहेत. त्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधी या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर असणे आवश्यक आहे. त्यानंतर सर्व पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने विचारलं की इलेक्शन घेण्याला कोणाचा विरोध आहे का? तर सर्व पक्षांनी आज असं सांगितलं की इलेक्शन घेण्याला कोणाचाही विरोध नाही. फक्त निवडणुका लवकरात लवकर व्हाव्यात आणि या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाच्या माध्यमातून व्हाव्यात. कारण राज्य सरकारने त्यांचे अधिकार काढून घेतलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आज सर्व बाजूंचं म्हणणं ऐकून घेतलं, मुख्य मुद्दा जो ओबीसी आरक्षणाचा होता. पण ज्या जागा आहेत त्या पूर्वस्थितीला नेऊन ठेवण्यात आल्या. सर्वोच्च न्यायालयाने असं सांगितलं की, ओबीसींना २०२२ पूर्वीचे जे आरक्षण होतं, सध्या तिथेच राजकीय आरक्षण परत देण्यात यावं आणि चार आठवड्यांच्या आत सर्व ज्या निवडणुका आहेत तर त्या राज्य निवडणूक आयोगाने घोषित कराव्यात.

## प्राप्त तक्रारींवरुन...

माध्यामातून लक्ष ठेवण्याची आणि माहिती मिळवण्याची सुरुवात करा असे निर्देश त्यांनी जिल्हा आरोग्य अधिका-यांना दिले. आतापर्यंत आलेल्या तक्रारींचा पाठपुरावा करण्यासाठी तालुकास्तरावरील अधिका-यांना सांगण्यात यावे जेणेकरुन अशा बोगस डॉक्टर्सवर गुन्हे दाखल करता येतील असेही जिल्हाधिकारी म्हणाले. बैठकीस समितीचे सदस्य सचिव प्र. पोलीस अधिक्षक उमाशंकर कस्तुरे तसेच सर्व समिती सदस्यांची उपस्थिती होती.

## राज्यात 16...

वैद्यकीय कीट, अतिरिक्त औषधे, टॉर्च आणि मेणबत्त्या ठेवण्याचे निर्देश दिले जाणार आहेत. मॉकड्रीलमध्ये सामान्य नागरिकांना काय शिकवलं जाणार- प्रशासनाने नागरिकांना सल्ला दिला आहे की, अशा परिस्थितीत मोबाईल उपकरणे आणि डिजिटल व्यवहार अयशस्वी ठरू शकतात. अशा परिस्थितीत तोंड देण्यासाठी आवश्यक ती रोख रक्कम जवळ ठेवावी. गृह मंत्रालयाने देशभरातील २४४ जिल्ह्यांमध्ये १०० हून अधिक संवेदनशील ठिकाणांची निश्चिती केली आहे. या मॉक ड्रिलमध्ये अनेक उपाययोजना समाविष्ट असणार आहेत. त्यामध्ये हवाई हल्ल्याचा इशारा देणारे सायरन वाजवणे, नागरिकांना नागरी संरक्षणाच्या उपाययोजनांचे प्रशिक्षण देणे, शत्रूच्या संभाव्य हल्ल्याच्या वेळी स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत मार्गदर्शन करणे, तसेच बंकर आणि खंदकांची स्वच्छता व तपासणी करणे यांचा समावेश आहे. महाराष्ट्र सरकार हायअलर्ट मोडवर- केंद्र सरकारच्या मॉक ड्रिलच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने हायअलर्ट जारी केला आहे. राज्य प्रशासनाकडून सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याच्या कडक सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने अंतर्गत स्तरावर हालचालींना गती दिली असून, सर्व पालकमंत्र्यांसह इतर मंत्र्यांना संबंधित प्रशासनाशी सातत्याने संपर्कात राहण्याचे आदेश दिले आहेत. उद्या राज्यातील १६ ठिकाणी मॉकड्रिल आणि ब्लॅकआऊट होणार आहे.

## उपमुख्यमंत्री अजित...

आहे. वडील दिवंगत संतोष देशमुख यांच्या मृत्यूनंतर अत्यंत दुःखद, आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जात मिळवलेले यश तुझ्या अंगभूत गुण, हुशारी, धैर्य, संयमाचे, जबाबदारीच्या जाणीवेचे दर्शन घडवणारे आहे. तुझ्या यशातून राज्यातील इतर विद्यार्थ्यांना लढण्याची, यशस्वी होण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास आहे. तुझ्या यशाने वडील स्वर्गीय संतोष देशमुख यांना खुप आनंद झाला असता. तुझ्या कष्ट, जिद्दीला सलाम. यापुढेही शैक्षणिक कारकिर्दीत, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर तुला असंच यश मिळत राहो, आम्ही सर्व कायमच तुझ्यासोबत आहोत, असा विश्वास देत उपमुख्यमंत्री पवार यांनी तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## अण्णाभाऊ साठेंच्या...

१९४९ मध्ये कम्युनिस्ट पक्षावर आलेल्या दडपशाहीदरम्यान शांताबाईंनी काही महिन्यांचा तुरुंगवासही भोगला. घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती असल्याने वयाच्या सोळाव्या वर्षीच औषध कंपनीत नोकरी स्वीकारावी लागली. आईसोबत कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना त्या कामगार संघटनांमध्ये सक्रीय राहिल्या.त्यांचा पगार अतिशय कमी असतानाही त्या दर महिन्याला अण्णाभाऊंच्या पहिल्या पत्नी कोंडाबाई आणि त्यांच्या मुलगा मधुकर यांना पैसे पाठवत असत. कौटुंबिक नातेसंबंधांतील ही माणुसकीची साखळी त्यांनी शेवटपर्यंत जपली.

साहित्य व सांस्कृतिक वारशाच्या पहिल्या साक्षीदार- अण्णाभाऊंच्या पहिल्या कथा, कादंबऱ्या, लोकनाट्य याच्या त्या पहिल्या वाचक व समीक्षक होत्या. त्यांनी काई चालं न गा, अकलेची गोष्ट यासारख्या लोकनाट्यांतून अभिनय, दिग्दर्शन व साहाय्य केलं.

गोरेगावच्या औद्योगिक वसाहतीत मिळालेलं भाड्याचं घर हे कॉ. अमर शेखांच्या प्रयत्नांमुळे शक्य झालं होतं, हे त्यांचे सहकाऱ्यांशी असलेले स्नेहसंबंध स्पष्ट करतं.

## तब्बल ३५...

माणसाच्या विष्ठेचे देखील पाणी बिडकर यांना प्यावे लागत आहे असे घाणीच्या साम्राज्याच्या समोर बीड शहरवासीयांना रोज सामना करावा लागत आहे मग बीड शहरांमध्ये रस्ते ना दुरुस्त असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना देखील त्याचा त्रास सहन करावा लागत आहे आता काही दिवसावरच पावसाळा येऊन ठेपला आहे बीड शहरातील काही भागांमध्ये मग धानोरा रोड असो किंवा अन्य बीड शहरातील भागामध्ये रस्ता देखील व्यवस्थित नाही खड्डेची खड्डेच पडलेले आहेत मग आता येणाऱ्या पावसाळ्यात विद्यार्थ्यांना नागरिकांना आबाल वृद्ध नागरिक यांनी कसे यायचे जायचे कसे जायचे रस्त्याने याचा देखील प्रश्न पडलेला आहे हे रस्ते देखील क्षिरसागर यांना व्यवस्थित करता आले नाही बीड शहराला २० २० दिवसांनी पाणीपुरवठा होतो हे दुर्दैव आहे ते पण कुत्रे मरून पडलेल्या पाईपलाईन द्वारे माणसाने विस्टा केलेले देखील त्या पाईपलाईन मध्ये काही वेळेस नागरिकांना दिसून आले ते पाणी देखील बिडकर यांना पिण्यासाठी देण्यात येते मग हा सगळा बीड नगरपालिकेचा भोंगळा कारभार चाललेला क्षीरसागर यांना माहीत नाही का का ते नुसतेच मतदानापुरते लोकांच्या समोर येतात म्हणून असे घाण साम्राज्य असलेले पाणी पाजून बीड शहर वाशीयांना क्षीरसागर यांनी कुठला पुरुषार्थ साध्य केला आहे ते त्यांनी पत्रकार परिषद घेऊन जनतेसमोर स्पष्ट करावे आता शिरसागर यांना कायमस्वरूपी जनतेने घरी बसवण्याची वेळ आली आहे नागरिक त्यांना कायमचे आता येणाऱ्या काळामध्ये घरी बसवल्याशिवाय राहणार नाहीत असे देखील चर्चा सध्या बीड शहरांमध्ये होत आहे म्हणून याच पार्श्वभूमीवर प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकामध्ये नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे आपण बीड शहरवासीयांच्या सोबत आहोत आपण सातत्याने लोकांच्या समस्या आणि अडचणी सोडवण्यासाठी कटीबद्ध आहोत हा जो काही प्रकार आहे कुत्रे मरुन पडलेल्या पाईपलाईन मध्ये लोकांना त्याचे घाण पाईपलाईन मध्ये सडलेले कुत्रे असलेले पाणी प्यावे लागले यासाठी आपण नगर प्रशासन दरबारी आवाज उठून व पाठपुरावा करून जनतेला बीड शहरातील न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाहीत असे ही या प्रसिद्धी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ शिराळे यांनी म्हटले आहे.

पान ४ वरून पुढे...

## वीज पडून ...

कुटुंबावर काळाने घाला घातला असून काल सोमवार रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास अभिमान नलबे हे अचानक अवकाळी व वादळ वारा व पाऊस आल्याने झाडाखाली थांबलेले होते यामध्ये या झाडाखाली थांबलेल्या नलबे यांच्या अंगावर वीज कोसळल्याने यामध्ये यांचा जागीच मृत्यू झाला आहे तरी अभिमान नलबे यांच्या जाण्याने पत्नी चार मुली व एक मुलगा हे पोरके झाले असून या कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे तरी अभिमान नलबे हे घरातील कमविते व कर्ते असल्याने त्यांचा मृत्यू झाल्याने त्यांचे कुटुंब उघड्यावर पडले आहे तरी त्यांना शासनाने व समाजातील दानशूर व्यक्तींनी व सामाजिक संस्था यांनी तात्काळ आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे.तरी या घडलेल्या दुर्दैवी घटनेची हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बीड येथून...

त्यांचे मुलगा यांनी एडवोकेट श्रीकांत जी कवडे यांच्यामार्फत माननीय हायकोर्ट औरंगाबाद येथे फौजदारी अर्ज दाखल केला होता सदरील फौजदारी अर्जावर सुनावणी होताना श्री तोतला यांचे वकील कवडे यांनी असे नमूद केले की पोलिसांनी चुकीच्या माहितीच्या आधारे गुन्हा दाखल केलेला आहे सदरील तांदूळ हा काळया बाजारात जात आहे तसेच सदरील तांदूळ हा राशन दुकानाचा आहे याचा कुठलाही पुरावा पोलीस गुन्ह्यामध्ये तसेच दोषारोप पत्रामध्ये सिद्ध करू शकलेले नाहीत व चौकशी अंती त्यांच्याकडे कुठलाही पुरावा दिसून येत नाही हा युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय हायकोर्टाने श्री प्रकाश तोतला व पवन तोतला बीड यांच्यावरील अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन येथे दाखल असलेला गुन्हा तसेच दोषारोपपत्र आरोपीचे वकील ड .श्रीकांत. जी .कवडे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने रद्द केले सदर प्रकरणाकडे सर्व मराठवाड्याचे लक्ष लागलेले होते त्यामुळे ड. श्रीकांत कवडे यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

## राजर्षी छत्रपती...

श्रीमती शीला मोहिते, आणि इतर प्राध्यापक व विद्यार्थी यांनी राजर्षी रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज यांना स्मृतिदिनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी बसपाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वासनिक यांनी रयतेचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून महिलांसाठी व बहुजनांसाठी महाराजांनी दिलेल्या आरक्षणाविषयी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून महिलांना दिलेली सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक स्वातंत्रता याविषयी विस्तृत अशी माहिती दिली. महिला आरक्षणाच्या माध्यमातून देशाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, श्रीमती द्रोपदी मुर्मु व अनेक मुख्यमंत्री, आयएएस, आयपीएस झालेल्या स्त्रियांनी याचा कशाप्रकारे लाभ घेऊन सत्ता प्रस्थापित केली याविषयी विस्तृत माहिती दिली. स्त्रियांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेल्या कार्याचा विसर न पडू देता त्यांना सतत स्मरणात ठेवून समता प्रस्थापित करण्यासाठी काम करावे व देशांमध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या विचारसरणीला अमलात आणून देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकांनी काम केले पाहिजे. देशामध्ये जातीयता, विषमता, वर्गवाद, वर्णवाद यापासून अलिप्त राहून देशात शांतता कशी राहील याकरिता तरुणांनी व सर्व नागरिकांनी देशाचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी सर्व जातीधर्मांना एकत्रित आनुन देशाच्या हितासाठी झटने कसे गरजेचे आहे हे स्पष्ट केले. तथागत भगवान बुद्धांचा हा भारत देश समतेचा पुरस्कर्ता आहे. सर्व जाती, धर्मांना, विविधतेंना एकत्रित गुण्या गोविंदाने नांदता येईल यासाठी घटनेनुसार आपले हक्क व कर्तव्याची जान ठेवून वागणे गरजेचे आहे. असा आशावाद व्यक्त करुन महाराजांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

## कपिलधारवाडी...

मंगळवार दि.६ मे २०२५ रोजी वैशाख शुद्ध ।।९।। पासून भव्यदिव्य सुरुवात झाली आहे. या पाच दिवसीय कीर्तन महोत्सवात आज बुधवार दि.७/५/२०२५ ह.भ.प अक्षय महाराज पिंगळे विनोदाचार्य (बीडकर) यांची हरीकिर्तन सेवा होणार आहेत. तरी या कीर्तन महोत्सवामध्ये भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी व वाघेश्वरी मित्र मंडळ कपिलधारवाडी यांनी केले आहे.

## धुराळा उडवत...

खूप परिणाम होत आहे तरी माननीय बांधकाम विभागाने या कंपनीला लवकरात लवकर या रस्त्यांचे काम पूर्ण करावे व जनतेची होणारे हाल पाहून पावसाळ्यापूर्वी सदरील काम कसे पूर्ण होईल याकडे विभागाने लक्ष्य द्यावें अशी मागणी होत आहे. कंपनीच्या हलगर्जीपणामुळे, माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर केलेल्या हाय युमुनिटी अंतर्गत मंजूर केलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा हा रस्ता सदरील कंपनीच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे मागील तीन ते चार वर्षापासून अत्यंत धिम्या गतीने सुरू असुन कंपनीच्या ठेकेदारामुळे या रस्त्याचे कासव गतीने सुरू आहे कंपनीच्या हलगर्जीपणामुळे या कामाला सातत्याने उशीर होत आहे या कामातील जेमतेम पस्तीस टक्के काम पूर्ण झाले असून मात्र त्यांचा दर्जा समाधानकारक नाही रस्त्यावरील वाहतूक वाढत असल्याने आधीच या रस्त्याची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. त्यात भर म्हणून आता धुळीने नागरिकांना हैराण केले आहे. त्यामुळे या धुळीने स्थानिकांना श्वसनाच्या आजाराला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावर काहीतरी उपाय करणे आवश्यक आहे.या रस्त्याला सतत गर्दी असते. शेतकरी बांधवाचे वाहने, बैलगाड्यांची ये-जा सुरूच असते. यामुळे ठिकठिकाणची धूळ आजूबाजूच्या घरांमध्ये पसरत आहे. वाहतुकीसाठी पूरक रस्ता कमी आणि खड्डेच जास्त अशी परिस्थिती आहे.येथिल परिसरात शाळा असल्याने शालेय विद्यार्थ्यांचा वावर नेहमी असतो. त्यामुळे वाहनांमुळे उडणारी धूळ रस्त्यावरून जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह स्थानिकांना त्रासदायक बाब झाली आहे. आधीच त्रास आहेच. आता त्यात धुळीचीही भर पडली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांतून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत.

## स्वामी विवेकानंद उच्च...

इंद्र मोहन दादा मुंडे, रंजीत मुंडे मेघराज मुंडे, डॉ.सतीश मुंडे, नंदराज मुंडे,धनराज मुंडे, डॉ.अभिजीत मुंडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या तसेच उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संतोष मुंडे सर, बोचरे सर, बांगर सर, मुंडे सर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादींनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## माजी उपमुख्यमंत्री ...

संस्थांमध्ये ओबीसी समाजाला सन २०२२ पूर्वी लागू असलेले २७ टक्के राजकीय आरक्षण पूर्ववत करण्याचे आणि राज्यात पुढील ४ महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. याबद्दल समता परिषदेचे राज्य सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ड. सुभाष राऊत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा.छगनरावजी भुजबळ साहेब, ज्यांच्या माध्यमातून हा पाठपुरावा सुरू होता असे माजी खासदार समीरभाऊ भुजबळ यांच्यासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब यांचे आभार व्यक्त केले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे राज्यभरातील ओबीसी समाजाने स्वागत केले असून बीड शहरामध्ये समता परिषदेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर फटाके वाजवून आणि पेढे वाटून न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याला आज मोठे यश मिळाले असून सुप्रीम कोर्टासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे. राज्यात सन २०२२ नंतर ओबीसी आरक्षणासंदर्भात नेमण्यात आलेल्या बांठिया कमिशनने योग्यरित्या अहवाल गोळा न केल्याने ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आले होते. या विरोधात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने सुप्रीम कोर्टात ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. याबाबत माजी खासदार समीरभाऊ भुजबळ हे स्वतः विशेष लक्ष देऊन सुप्रीम कोर्टात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने विशेष प्रयत्न करत होते. याचिकेच्या सुनावणीदरम्यान माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, ड. मंगेश ससाणे हे ज्येष्ठ वकिलांसह दिल्लीत उपस्थित होते. त्यांनी सर्वांशी चर्चा करून आपली भूमिका मांडली.

## प्रतिकूल परिस्थितीवर...

नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे. वडिल प्रकाश यादव, व आई सौ सविता प्रकाश यादव यांची परिस्थिती हालाखीची असताना देखील खचून न जाता दिवस- रात्र कबाड कष्ट मेहनत करून आपल्या पोटाला चिमटा घेत तीनही कन्याला उच्च शिक्षण दिले आणि त्यांचे यशस्वी संगोपन केल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे

## बीड शहरांमध्ये...

ज्यांनी बीड जिल्ह्यातील बीड शहरातील सर्व नागरिकांच्या मनामध्ये त्यांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून उत्कृष्ट असे समाज हिताचे कार्य करून एक आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे अशा उत्कृष्ट समाजसेविका म्हणून ज्यांची ओळख बीड जिल्ह्याला आहे आशा श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांना देखील या कार्यक्रमाच्या ठिकाणी गेस्ट म्हणून उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केले होते याच पार्श्वभूमीवर त्यांचे कार्य अतिशय उत्कृष्ट आणि अप्रतिम समाजसेवेचे असल्यामुळे त्यांना देखील मान्यवरांच्या हस्ते पद्मपाणि पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले व त्यांच्या पुढील उत्कृष्ट समाजसेवेच्या कार्यासाठी सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या सीमाताई ओस्तवाल यांच्या कार्याचा जर विचार केला तर शब्दात व्यक्त करणे देखील शक्य नाही २०१९ लॉकडाऊन कोरोना महामारीच्या लॉकडाऊन च्या काळामध्ये देखील गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांनी बीड जिल्ह्यातील प्रत्येक खेड्यापाड्यांमध्ये भेटी देऊन तसेच बीड शहरांमध्ये प्रत्येक ठिकाणी गोरगरीब लोकांना भेटी देऊन एकंदरीतच कोरोना महामारीच्या काळामध्ये तब्बल सिमा ताई ओस्तवाल यांनी अडीच हजार लोकांना लोकांपर्यंत पोचून किराणा किट धान्य देखील मोठ्या प्रमाणात त्यांनी वाटप केलेले आहे दुष्काळी परिस्थितीमध्ये अठरा हजार लोकांना तीन वेळेच्या जेवणाची देखील व्यवस्था त्यांनी केलेली होती तसेच दुष्काळामध्ये गावागावांमध्ये जाऊन ४५ दिवस मोफत पाणी पुरवठा देखील त्यांनी उपलब्ध करून दिलेला आहे तसेच गोरगरीब लोकांच्या मुलांना देखील शाळेमध्ये गणवेश वाटप करण्याचे कार्य देखील त्यांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने केलेले आहे तसेच त्यांनी वृक्षारोपण देखील मोठ्या प्रमाणामध्ये बीड शहराच्या ठिकाणी केलेले आहे तसेच बीड शहराच्या आजूबाजूच्या ठिकाणी तसेच बीड तालुक्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण देखील त्यांनी केलेले आहे तसेच नागरिकांचे नेत्र तपासणी नेत्र शिबिर असे बीड शहरामध्ये त्यांनी मोठ्या मोठ्या शिबिराचे देखील त्यांनी आयोजन केलेले आहे या शिबिरामध्ये अनेक लोकांना त्यांनी मोफत नेत्र शस्त्रक्रिया मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून दिलेले आहे अनेक मोफत चष्मे वाटलेले आहेत सीमाताई ओस्तवाल यांनी बीड जिल्ह्यामध्ये अनेक समाज हिताचे उत्कृष्ट असे समाजसेवेचे कार्य केलेले आहे.

## पोलिसाच्या गाडीची...

पंढरपूरहून आपल्या गावी नेकनूरकडे मोटारसायकलवर येत होते. रात्री अकराच्या दरम्यान त्यांच्या मोटारसायकलला बीड येथील एका पोलीस कर्मचाऱ्याची गाडी (क्र. एम. एच. २३ बी. एच. १८३६) ने जोराची धडक दिली. या अपघातात शिक्षक शेख मुदस्सीर गंभीररित्या जखमी होऊन ठार झाले. या प्रकरणी नेकनूर पोलिसांनी सदरीलही गाडी ताब्यात घेऊन संबंधितांविरोधात गुन्हा दाखल केला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीडच्या जनतेला स्वच्छ, निरोगी, निर्जंतुक पाणी द्या : नितीन जायभाये

**जनतेच्या आरोग्याशी खेळू नका, स्वच्छ पाण्यासारखा पारदर्शक कारभार पाहिजे ; तहान लागल्यावर आड शोधणारे व खांदणारे प्रशासन, अधिकारी, नेते, पुढारी आमदार, खासदार, एरवी पाच पाच वर्षे असतात कुठ.....?**

### ▸ बीड शहर बचाव मंचाचा जनतेच्या वतीने संतप्त सवाल..

बीड । प्रतिनिधी



फिल्टर प्लांट पासून ४० किलोमीटर अंतरापर्यंत पाईपलाईनचा वॉश आऊट घेण्याआधी रमजान ईद- गुढीपाडवा आणि तत्सम सणांच्या काळात आधी आणि नंतर त्याच पाईपलाईन मधून बीड शहरातील जनतेला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा चालू होता. गेल्या कित्येक दिवसांपासून त्याच पाईपलाईन मधून आलेले पिण्याचे पाणी बीड शहरातील जनतेच्या घराघरांमध्ये भरून ठेवण्यात आलेले आहे व काटकसरीने वापरात आहे. ते पाणी स्वच्छ, निरोगी, निर्जंतुक-शुद्ध पिण्यास योग्य आहे का नाही ते नगरपालिकेने व प्रशासनाने खुलासा करून सांगावे ही बीड शहर बचाव मंचाच्या वतीने प्रशासनाला जनहितार्थ मागणी करण्यात येत आहे. उष्णतेच्या या लाटेमध्ये अशुद्ध पाणी पिण्यामुळे घरोघर लोक आजारी पडत आहेत साथीच्या रोगांचे बळी पडत आहेत. याची जिम्मेदारी कोणाची ? दुरुस्तीच्या कामांच्या ठिकाणी व तुमच्या फिल्टर प्लांट च्या ठिकाणी व परिसरात पाईपलाईन मध्ये उंदीर, घूसी, मांजरं मुंगूस, साप, कुत्र्यांची पिले- कुत्रे इतर काही उपद्रवी प्राणी घुसू नयेत यासाठी काय उपयोजना केल्या आहेत? व याची जिम्मेदारी कोणाची याचाही प्रशासनाने खुलासा करावा. स्वच्छ शुद्ध निर्जंतुक, निरोगी पाणी जनतेला पिण्यास पुरवण्याची जिम्मेदारी ही नगरपालिकेची व प्रशासनाची आहे. शुद्ध पिण्याच्या पाण्यावर जनतेचा अधिकार आहे. जनतेच्या हक्काचे पाणी जनतेला वेळेवर मिळायलाच पाहिजे. उन्हाळ्यात- पावसाळ्यात येणाऱ्य नैसर्गिक संकटातून जनतेला वाचवण्यासाठी बीड नगरपालिका कधीही पूर्वतयारी करत नाही. संबंधित नेते पुढारीही याबाबतीत कधी विचार करत नाहीत. तत्सम काही नेते पुढारी व आमदार तहान लागल्यावर आड शोधायला व खांदायला निघालेले आपल्याला नेहमीच दिसतात. नैसर्गिक आपत्तींच्या आधी पूर्वतयारी म्हणून काही करताना व आवश्यकत्या योजना राबवताना हे कधी कुठेही दिसत नाहीत. ठोस, पारदर्शक व दूरदृष्टी असलेला कारभार राबवताना, जनतेच्या पैशावर मौज मज्जा मारणारे प्रशासन, अधिकारी, नेते-पुढारी, आमदार-खासदार हे नेहमीच अपयशी झालेले आपल्याला दिसत आहेत. बीड शहरालगत अनेक दिवसांपासून पाईपलाईन दुरुस्तीचे काम चालू आहे. या दुरुस्ती दरम्यान पाईपलाईन मध्ये मेलेली कुत्रे मिळून आली, लाखो लिटर पाणी व पाईपलाईन वॉश आऊट साठी साठी नदीमध्ये सोडण्यात आले अशी माहिती परिसरातील काही नागरिकांनी फोन द्वारे कळवली होती. यामुळे जनतेच्या मनामध्ये शंका कुशंका व संभ्रम निर्माण झाला आहे. हा जीवनावश्यक पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील प्रश्न आहे. या प्रश्नावर सर्वसामान्य जनता म्हणून आम्ही अति संवेदनशील आहोत. हा आमचा व आमच्या कुटुंबांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. नक्की काय प्रकार आहे याचा खुलासा नगरपालिकेने व प्रशासनाने करावा अशी बीड शहर बचाव मंचच्या वतीने जनहितार्थ मागणी करण्यात येत आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन

**महिला व युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा - मिनाक्षीताई देवकते (डोमाळे)**

बीड । प्रतिनिधी




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३१ मे २०२५ रोजी त्रिशताब्दी जयंती आहे. त्या निमित्त धनगर समाज अहिल्या महिला आघाडी आणि बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.१० ते ३१ मे २०२५ या कालावधीत महिला व युवतींसाठी मोफत लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून बीड शहरातील महिला व युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांनी केले आहे.

ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज उत्तम आणि महान राजे होते त्याच प्रमाणे अहिल्यादेवी होळकर या देखील स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होत्या. यावर्षी महाराष्ट्रासह भारतात त्यांची त्रिशब्दी जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. याच अनुषंगाने महिला व युवतींवर होणार्या अन्याय, अत्याचारावर वचक बसावा आणि महिला व युवती या निर्भिड व्हाव्यात यासाठी बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने दि.१० मे २०२५ पासून छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायं.५ ते ६ या वेळेत लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. २८ मे रोजी रांगोळी स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली असून स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षीस व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळावा यासाठी निबंध स्पर्धा देखील घेण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर महिला, युवक, युवतींनी तसेच विद्यार्थ्यांनी दि.३१ मे २०२५ पर्यंत आपले निबंध बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था कार्यालय पिंपरगव्हाण रोड, काळे कॉम्प्लेक्स इमारत येथे द्यावेत अधिक माहितीसाठी संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षीताई देवकते-डोमाळे, मो. ९०७५५५८८०७, ८२३७९१९१६२ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराणी ताराबाई उच्च मा.विद्यालयाची बारावीच्या उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम

**विज्ञान शाखेतून धाईतिडक पायल ८४.८३ % गुण घेऊन तर कला शाखेतून ८३.८३ % मिळवून हिरे केशव प्रथम**

वडवणी । प्रतिनिधी





महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचा इयत्ता १२ वी प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल घोषित झाला असुन संस्कार शिक्षण मंडळ वडवणी, संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १२ वी परीक्षेचा सरासरी निकाल ९७.१७ % लागला असून प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या बारावी प्रमाणपत्र परीक्षाचा निकाल सोमवार दि.०५ मे २०२५ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. यामध्ये वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात नामांकित असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा ९९.३६ % तर कला शाखेचा ९३.४० % तर दोन्ही शाखेंचा एकूण सरासरी ९७.१७ % निकाल लागला आहे. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यालयाने उज्वल यशाच्या निकालाची परंपरा कायम ठेवली असून विज्ञान शाखेतून कु.पायल भाऊसाहेब धाईतिडक ८४.८३ % गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर ८४.३३ % गुण घेऊन कु.प्रतीक्षा महादेव लोंढे हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे तर चि.प्रतीक शिवाजी धाईतिडक यांनी ८३.८३% गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे. तसेच कला शाखेतून चि.केशव महादेव हिरे यांनी ८३.८३ % गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर कु.तनुजा बालाजी राऊत हिने ८३.५० % गुण घेऊन द्वितीय क्रमांक आला आहे तर कु.दिव्या नरहरी डोंगरे व चि.ईश्वर बाळू घुगे या दोघांना ७९.३३% समान गुण घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत भैय्या धस, संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे व विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी , उपप्राचार्य मस्के सर, पर्यवेक्षक धाईतिडक सर, श्री. डोईफोडे सर, श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम, एचएससी बोर्ड परीक्षेचे परिक्षा विभाग प्रमुख प्रा.कांबळे आर.आर., प्रा.मुंडे सी.व्ही., प्रा.अंडील जी.पी., प्रा. डाके सर, प्रा.केदार सर, प्रा.राठोड सर, प्रा.मुंडे बी.डी., प्राध्यापिका कचरे मॅडम, प्राध्यापिका उघडे मॅडम, सावंत सर यांच्यासह विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक उज्वल भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# श्री क्षेत्र मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे परमपूज्य गुरुमाऊलीच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय महासत्संग सोहळा महिला सक्षमीकरण मेळावा

बीड । प्रतिनिधी



छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ राजमाता राष्ट्रमाता आईसाहेब जिजाऊ साहेब यांचे जन्मस्थळ, राजे लखुजीराव जाधव यांची कर्मभूमी या पवित्र भूमीमध्ये हा ऐतिहासिक कार्यक्रम होणार आहे. परब्रह्म भगवान श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या कृपेने आणि परमपूज्य गुरुमाउली अण्णासाहेब मोरे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्गामार्फत राष्ट्रहित व विश्वकल्याणासाठी समर्पित असलेल्या अनेक उपक्रमांची अखंड शृंखला देशभरात यशस्वीपणे राबवली जात आहे. सामाजिक, आध्यात्मिक व पर्यावरणीय सेवा कार्याचा हा प्रवाह २०% आध्यात्म आणि ८०% समाजसेवा या उद्घोषणेनुसार निरंतर वाहत आहे. हीच विश्वकल्याणाची भावना मनामध्ये ठेवून, राजमाता जिजाऊ यांचे पावन जन्मस्थळ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ मातृतीर्थ सिंदखेडराजा (जि. बुलढाणा, महाराष्ट्र) येथे दिनांकः २० मे २०१७ रोजी राष्ट्रीय महासत्संग सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा महिला सक्षीमी करणासाठी व व विश्वशांतीच्या पवित्र हेतूसाठी समर्पित आहे. या महासत्संगाच्या निमित्ताने खालील सेवाभावी उपक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. सर्वथर्म समभावाने निःशुल्क सामूहिक विवाह नोंदणी सेवा, कृषी मेळावा व प्रशिक्षण शिविर सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी, स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबिरे बेरोजगार युवक-युवती आणि महिलांसाठी, निःशुल्क आरोग्य तपासणी, औषधवाटप व रक्तदान शिबिर, पर्यावरण जनजागृती आणि स्वच्छता अभियान. सर्व भाविकांना व सेवेकऱ्यांना कळविण्यास आनंद वाटतो की, पखम भगवान श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांनी विश्वकल्याणात्मक, राष्ट्रीय उन्नतीसाठी अनेक यशस्वी अभियान राबविले आहेत. त्यांची अनुभूती सर्वजण घेतच आहेत, त्यांच्या या विश्वात्मक तळमळीतून अनेक कार्यक्रमांचे प्रकटीकरण झालेले आहे. त्याच अनुषंगाने अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मागीचे प्रमुख परमपूज्य गुरुमाऊली यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ राजमाता राष्ट्रमाता आईसाहेब जिजाऊ यांचे जन्मस्थळ राजे लखुजीराव जाधव यांची कर्मभूमी या पवित्र भूमीमध्ये हा ऐतिहासिक कार्यक्रम मातृतीर्थ सिंदखेडराजा, जि. बुलढाना येथे होणार आहे, त्याच अनुषंगाने जागर स्त्री शक्तीचा, गजर राष्ट्र भक्तीचा विश्वशांती हेतू राष्ट्रीय महासत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच २०% आध्यात्म आणि ८०% समाजसेवा या उक्तीनुसार मोफत सर्व जाती धर्मीय विवाह नोंदणी, विविध कृषी मेळावे व शेतकऱ्यांसाठी मोफत प्रशिक्षण, बेरोजगार मुला-मुलीना व गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे मोफत आरोग्य शिवीर, औषधी वाटप, अन्नदान, पर्यावरण विभाग अंतर्गत विविध समाज उपयोगी अनेक सामाजिक उपक्रम सतत राबविले जात आहेत.

# व्यापारी महासंघाच्यावतीने विवेक जॉन्सन यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी



बीडचे नूतन जिल्हाधिकारी , विवेक जॉन्सन्स यांचा बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या कार्यकारिणी सदस्यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा बीड जिल्हा व्यापारी कार्यकारणीने सदिच्छा भेट व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी व्यापाऱ्यांच्या काही अडचणी असतील तर त्या सोडविण्या साठी मी कायम शासनदरबारी तत्पर असेल व व्यापाऱ्याला प्रशासनाचे नेहमीच सहकार्य राहील असे त्यांनी सांगितले . यावेळी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष भास्कर जाधव , कार्याध्यक्ष अशोक शेटे , बीड शहर अध्यक्ष प्रकाश कानगावकर , सचिव सूर्यकांत महाजन , होलसेल किराणा अध्यक्ष जवाहरलाल कांकरिया

# प्रशासनाच्या विनंतीला मान देऊनही परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडलेलेच - ॲड.मनोज संकाये

बीड । प्रतिनिधी



गेल्या तीन वर्षापासून परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम पूर्ण करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी प्रशासनाकडे केली होती. १ मे रोजी प्रशासनाला रस्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता परंतु उपजिल्हाधिकारी माननीय अरविंद लाटकर साहेब तसेच परळी पोलीस स्टेशनचे पीआय डोने साहेब यांनी संबंधित अधिकाऱ्यां सोबत दूरध्वनी वरून चर्चा केली परंतु त्या चर्चेचा काही उपयोग झाल्याचे दिसून येत नाही. अधिकारी इतके मग्रूरपणे वागत आहेत की त्यांना प्रशासनातील अधिकारी सांगून सुद्धा त्यांना फरक पडत नाही त्यामुळे आता एक तर काम पूर्ण करा किंवा जनआंदोलन उभारल्याशिवाय पर्याय नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी म्हटले आहे.

# कुमारी श्रावणी अनिल कातखडे चे बारावी परीक्षेत घवघवीत यश

बीड । प्रतिनिधी



मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्यमिक मंडळाने घेतलेल्या इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून नवगण राजुरी येथील श्री गजानन विद्यालयाची विद्यार्थिनी कु.श्रावणी आणिल कातखडे ने ९१ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे .

नियमित अभ्यास ,आई आणि वडिलांचे मार्गदर्शन याबरोबरच कॉलेजमधील सरांच्या मार्गदर्शनामुळे मला हे यश मिळाले असे श्रावणीने आपल्या गुरु विषयी व आई-वडिलांविषयी आदर भावनेने या यशाचे गमक सांगितले .या यशामुळे श्रावणीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. यामध्ये तिचे आजोबा जगन्नाथ कातखडे, सुखदेव तुपे, चंद्रकला तुपे, काका डॉ. राहुल कातखडे , डॉ शीतल कातखडे, आई सौ मनीषा अनिल कातखडे शीलाताई धोंडे तसेच दैनिक चंपावती पत्र चे महादेव नाना साळुंके, सौ वृंदावनी साळुंके यांच्यासह सर्वांनी तिचे कौतुक करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या

# सौ कल्पना पारस बोरा यांचे अल्पशा आजाराने निधन

बीड । प्रतिनिधी



जुना नगर नाका येथील प्रतिष्ठित व्यापारी पारस शांतीलाल बोरा यांच्या पत्नी कल्पना बोरा वय(४९ )याचे अल्पशा आजाराने दुःखत निधन दिनांक ०६/०५/२०२५ रोजी सायंकाळी ६ वा दुःखद निधन झाले . त्यांच्या पश्चात ३ मुली व १ मुलगा असा परिवार आहे. दिनांक ७/५/२५रोजी सकाळी१०वाजता अमरधाम मोंढा रोड बीड येथे होईल

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात लोकराजा राजर्षी शाहू महाराजांची पुण्यतिथी साजरी

बीड । प्रतिनिधी

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने कृतीशील व प्रगतीशील लोकराजा श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

सर्व प्रथम राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस संस्थेचे सचिव प्रा. जे.पी. शेळके, संचालक प्रा. डंबरे ए.आर, मुख्याध्यापिका श्रीमती कदम एस.डी., प्राथमिकचे प्र. मुख्याध्यापक राऊत आर.टी. यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी बोलतांना मान्यवरांनी राज्याच्या सर्वांगीण विकासाचे सर्वोत्तम उदाहरण घालून देणारे आदर्श शासनकर्ते आणि बहुजनांमध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण करणारे दृष्टे समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनचरित्रावर आपापले मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, यांची उपस्थिती होती.



CMYK

दैनिक मराठवाडा पत्र

epaper.marathwadapatra.com

बुधवार, दि.०७ मे २०२५ पान ४

## वीज पडून ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील शेतकरी अभिमान नलभे वय ३५ वर्षे हे शेतात झाडाखाली थांबले असता ०५/०५/२०२५ सोमवार रोजी सायंकाळी ६.०० वाजता अचानक आलेल्या अवकाळी पाऊस व वाऱ्यामध्ये त्यांच्या अंगावर वीज पडून ते जागीच मृत्यू मुखी झाल्याची घटना घडलेली आहे. वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील अभिमान नलभे वय ३५ वर्षे यांना एक एकर शेती असून त्यांना पत्नी, चार मुली व एक मुलगा असा परिवार असून ते मजुरी व शेती करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत असत यामध्ये या ▶▶ उर्वरित पान २ वर

# रस्ता बनला पाण्याचं तळं; गेवराईत पावसाचे पाणी रस्त्यावर, नागरिकांची गैरसोय !




**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील देवगिरी हॉस्पिटलच्या परिसरात पडलेल्या पावसामुळे चक्क रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्यामुळे नागरिकांना ये जा करण्यासाठी मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. या बाबत नगर परिषद कधी लक्ष देणार ? असा सवाल या निमित्ताने उपस्थित केला जात आहे दवाखाने, मेडीकल, झेराक्स दुकान, पतसंस्थेचे कार्यालय, व शिवसेना पक्ष कार्यालय असल्यामुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे अन्य छोटी मोठी दुकाने असल्यामुळे या परिसरामध्ये नागरिकांची सतत काही ना काही ना काही कारणास्तव ये जा असते मात्र याच मार्गावरून ये जा करण्यासाठी असलेल्या नालीचे काम नगरपालिकेने अद्याप सुरू न केल्यामुळे पावसात पडलेले पाणी चक्क रस्त्यांवर साचले आहे.पाण्याला योग्य दिशा मिळण्यासाठी नालीचे काम झालेले नाही. त्यामुळे जवळपास दोन-तीनशे मीटर अंतरात घाण पाणी साचून राहते. या घाणीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. मुख्य रस्ता असून या रस्त्यावर मोठी वाहतूक सतत असते. मुख्य रस्त्याचे रूपांतर सध्या पाण्याच्या मोठ्या तळ्यामध्ये झालेले आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे या भागातील रस्त्यावर प्रचंड पाणी साचले होते रस्त्याच्या कडेला गटारीची सुविधा नसल्यामुळे सदरचे पाणी वाहून जाण्यास कोणतीही जागा नाही जाणीवपूर्वक या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात हे पाप नगरपरिषद व ठेकेदार करत असल्याने नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे.

## बीड येथून राशन दुकानातील ३०० क्विंटल तांदूळ काळया बाजारात जाताना पकडलेला गुन्हा हायकोर्ट मध्ये रद्द: ॲड. श्रीकांत कवडे

**बीड । प्रतिनिधी**



अहिल्यानगर कॅम्प पोलीस स्टेशन यांना मिळालेल्या गुप्त माहिती द्वारे बीड येथून निघालेला आणि कॅन्टोन्मेंट येथे पकडण्यात आलेला सोळा चाकी ट्रक मध्ये मिळून आलेल्या तीनशे क्विंटल तांदूळ जप्त करून महेश गृह उद्योग बीड यांचे मालक प्रकाश तोतला व त्यांच्या मुलावरील गुन्हा व दोषारोप पत्र माननीय हायकोर्ट औरंगाबाद मध्ये रद्द करण्यात आले. प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांना क्राईम ब्रँच यांच्याकडून अशी गुप्त माहिती मिळाली की बीड येथून एक सोळा चाकी ट्रक हा राशन दुकानातील तांदूळ घेऊन काळया बाजारात विकण्यासाठी पनवेल येथे जात आहे या माहितीवरून अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांनी सापळा रुचून सदरील ट्रक हा कॅन्टोन्मेंट येथे पकडला व तपासणी केली असता सदरील ट्रक मध्ये सहाशे गोण्या तांदूळ असे एकूण ३०० क्विंटल मिळून आला सदरील तांदळाची माहिती ड्रायव्हरला विचारले असता त्याने सांगितले की सदरील तांदूळ हा महेश गृह उद्योग बीड यांचे मालक प्रकाशजी तोतला यांनी राशन दुकानातील तांदूळ घेऊन प्रोसेस करून सदर तांदूळ हा काळया बाजारात विकण्यासाठी पनवेल येथे नवाकार उद्योग येथे पाठवलेला आहे त्याचबरोबर सदरील तांदळाचे पावतीची मागणी केली असता ती ड्रायव्हर कडे मिळून न आल्यामुळे अहमदनगर कॅम्प पोलीस स्टेशन यांनी प्रकाश तोतला व त्यांचा मुलगा व ड्रायव्हर व इतर एक जनावर जीवनावश्यक वस्तू कायद्याचे अधिनियम तीन व सात नुसार गुन्हा दाखल केला होता. सदरील गुन्हा रद्द करण्यासाठी प्रकाश तोतला व

▶▶ उर्वरित पान २ वर

## राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना महामानव अभिवादन ग्रुपचे विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**



रयतेचे राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १०३ व्या स्मृतिदिनानिमित्त छत्रपती संभाजी क्रीडा संकुलन येथील पुतळ्यास महामानव अभिवादन ग्रुप व शासकीय नर्सिंग कॉलेज जिल्हा रुग्णालय, बीड यांच्यातर्फे पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपचे मार्गदर्शक आयु. डी.जी. वानखेडे, कॅप्टन राजाभाऊ आठवले,(मेजर समता सैनिक दल, बीड) आयु. प्रशांत वासनिक, एडवोकेट तेजस वडमारे तसेच शासकीय नर्सिंग कॉलेज जिल्हा रुग्णालय बीड चे प्रचार्य डॉ. सुवर्णाताई बेंद्रे, उपप्रचार्य

▶▶ उर्वरित पान २ वर

## कपिलधारवाडी येथील पाच दिवशीय किर्तन महोत्सवास प्रारंभ

### आज ह.भ.प अक्षय महाराज पिंगळे यांची हरीकिर्तन सेवा

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र मन्मथ स्वामी देवस्थान पासून जवळ असलेले कपिलधारवाडी येथे ग्रामदैवत वाघेश्वरी माता देवीच्या कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त पाच दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आज महंत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शनाने व आशीर्वादाने तसेच विश्वनाथ आप्पा सलगर श्री क्षेत्र कपिलधार , दत्त उपासक श्री वैजनाथ महाराज शिंदे दत्त संस्थान बालाघाट यांच्या



प्रमुख उपस्थितीत व शुभ हस्ते

▶▶ उर्वरित पान २ वर

## धुराळा उडवत रंगला वाहनांचा थरार रस्त्यांवर चालकांची तारांबळ

### रस्त्यांच्या कामाचा कंपनीच्या ठेकेदाराकडून खेळखंडोबा ; रस्त्यावर धुळीचे साम्राज्य, नागरिक हैराण सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष ? माजी आमदार लक्ष्मण पवारांच्या कार्यकर्दीत सुरू केलेल्या रस्त्यांवर धुराळा ; चकलंबा ते पांढरवाडी फाट्यावर सर्वत्र धुळ

**गेवराई । प्रतिनिधी**

मागील तीन वर्षांपासून सुरू असलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा सुरू असलेल्या काम खूप संथ गतीने चालू आहे तरी सदरील विभागाने या कामात दिरंगाई करणाऱ्या कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी याबाबत सविस्तर वृत्त असे की असा की मागील तीन



ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या चकलांबा ते पांढरवाडी फाटा हा रस्ता सदरील कंपनी खूपच धिम्या गतीने काम करत आहे व या कामाचा फटका या रोडवर असलेल्या गावांना खूप त्रास सहन करावा लागत आहे या धुळीच्या त्रासामुळे की त्यांनी कित्येक लोकांच्या आरोग्यावर ▶ उर्वरित पान २ वर

### स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय वडवणीच्या कॉलेजची उज्वल यशाची परंपरा कायम

**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथील विद्यार्थ्यांनी प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी उज्वल यश संपादन केले आहे. या उच्च माध्यमिक विद्यालयाच्या निकालाची टक्केवारी एकूण ९५.२३%आहे. उच्च माध्यमिक विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थे चे संस्थापक अध्यक्ष मा. बन्सी भाऊ मुंडे, संस्थेचे सचिव मा. श्रीमंत तात्या मुंडे तसेच संस्थेचे मार्गदर्शक मा.

▶▶ उर्वरित पान २ वर

## माजी उपमुख्यमंत्री मा. छगनरावजी भुजबळ साहेब आणि समता परिषदेच्या लढ्याला मिळाले यश : ॲड. सुभाष राऊत

**स्थानिक स्वराज्य संस्थातील ओबीसीचे आरक्षण कायम ठेवल्याबद्दल बीडमध्ये समता परिषदेचा जल्लोष**



**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसी राजकीय आरक्षणासंदर्भात माजी उपमुख्यमंत्री मा. छगनरावजी भुजबळ साहेब आणि समता परिषदेच्या पाठपुराव्याला मोठे यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत 71.50 टक्के गुण संपादन करून मिळविले घवघवीत यश

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी विज्ञान परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे यामध्ये अनुकूल परिस्थितीवर मात करत कु. यादव मंजुळा प्रकाश हिने ७१.५० % मार्क घेऊन घवघवीत यश संपदान केले आहे. तालुक्यातील माजलगाव तेलगाव हवे लगत सावता नगर पात्रुड येथे रहिवासी असलेल्या गरीब कुटुंबातील



परिस्थितीला मात करत कसल्याही प्रकारचे क्लास न लावता बारावी विज्ञान परीक्षेमध्ये ७१.५० टक्के मार्क्स घेऊन घवघवीत यश संपादन केले तिच्या या यशाबद्दल तिचे आई-वडील मित्र-मैत्रिणी कॉलेज प्रशासन ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहरांमध्ये सर्वात नामांकित असलेले गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या उत्कृष्ट कार्याचे सर्वत्र होत आहे कौतुक या प्रतिष्ठानचा आदर्श महाराष्ट्रातील इतर प्रतिष्ठानने घेणे गरजेचे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरासह बीड जिल्ह्याचे नाव आपल्या उत्कृष्ट आणि उल्लेखनीय समाज हिताच्या व समाजसेवेच्या माध्यमातून बीड जिल्ह्याचे व बीड शहराचे सर्वत्र महाराष्ट्रामध्ये नावलौकिक करणारे अशा सर्वात बीड जिल्ह्यामध्ये अग्रेसर असलेल्या समाजसेवेच्या माध्यमातून सातत्याने समाजाची सेवा करणाऱ्या अशा उत्कृष्ट आणि कर्तव्यदक्ष लेडी सिंघम समाजसेविका म्हणून ज्यांची ओळख



आहे अशा श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांना बीड येथे संपन्न झालेल्या पद्मपाणि पुरस्काराने या प्रतिष्ठानचे स्मृतिचिन्ह देऊन

*बीड शहरा सह बीड जिल्ह्याचे नाव गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून करत असलेल्या उत्कृष्ट समाजसेवेच्या कार्यातून नाव लौकिक करणाऱ्या लेडी सिंघम समाज सेविका श्रीमती सीमाताई ओस्तवाल यांना पद्मपाणि पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.*

पद्मपाणि पुरस्काराने सन्मानित करण्यात आले हा कार्यक्रम ४ मे रोजी म्हणजेच रविवारी बीड शहरातील नामांकित असलेले यशवंत नाट्यगृह या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला या कार्यक्रमाच्या ठिकाणी गेस्ट म्हणून उपस्थित असलेले दैनिक लोकाशाचे मुख्य संपादक विजय राज बंब उत्तम पवार सर सह गेस्ट मान्यवर उपस्थित होते मग बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके साहेब लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब तसेच शिक्षण अधिकारी बोराडे ताई तसेच पद्मपाणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीपजी तरकसे, सिंधू बोराडे, आत्माराम वाव्हल, नितेश उपाध्यक्ष जिल्हा प्रशासनातील इतर विभागातील देखील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते याच पार्श्वभूमीवर ज्यांची समाजसेवेच्या माध्यमातून बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील नागरिकांना ओळख निर्माण झाली आहे ▶▶ उर्वरित पान २ वर

## पोलिसाच्या गाडीची मोटार सायकलला धडक; शिक्षक ठार

**नेकनुर । प्रतिनिधी**

भरधाव वेगात निघालेल्या पोलिसाच्या खासगी गाडीने मोटार-सायकलला जोराची धडक दिल्याने मोटारसायकलवरील शिक्षक जागीच ठार झाल्याची घटना रात्री अकराच्या दरम्यान चौसाळा बायपासवर घडली.

नेकनूर येथील शिक्षक शेख मुदस्सीर ताहेर हाशमी (वय ४६ वर्षे) हे पंढरपूर येथे एका खासगी शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत होते. काल बारावीचा निकाल होता. निकाल लागल्यानंतर ते

▶▶ उर्वरित पान २ वर

